पुण्य नगरी

# आता ॲपने कळणार वापरण्यायोग्य स्वच्छतागृह

## पनवेल पालिकेच्या मोबाईल ॲपचे उद्घाटन, २८८ शौचालयांमधील २,५०० सीट्सची माहिती होणार उपलब्ध

। पनवेल । पनवेल महापालिकेने आपल्या हद्दीतील स्वच्छतागृहांची माहिती देणारे महाराष्ट्रातील पहिले ॲप लॉन्च केले आहे. शुक्रवारी आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते स्वच्छतागृहांची माहिती देणाऱ्या 'स्वच्छता हर कदम' या मोबाईल

ॲपचे मुख्यालयात उद्घाटन करण्यात आले. या ॲपच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील एकूण २८८ शौचालयांमधील २५०० सीट्सची स्वच्छता व पायाभूत सुविधांच्या स्थितीची रिअल टाइम माहिती मिळणार आहे. स्वच्छता निरीक्षकांसाठी याचे प्रशिक्षण शुक्रवारी फडके नाट्यगृहात देण्यात आले.

हे ॲप व्हॅलेक्टस कंपनीने महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये स्टार्टअपच्या माध्यमातून विकसित केलेले आहे. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीने यासाठी निधी दिला आहे. हे ॲप ॲपल व ॲंड्राईड मोबाईलवर डाऊनलोड करता येणार आहे. ॲपच्या उद्घाटनप्रसंगी उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, हितेन जोशी, पिल्लईचे मुख्य ऑपरेटिंग ऑफिसर प्रियम पिल्लई, निवेदिता श्रेयांश, प्राध्यापक शरद शिंगाडे, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे आदी उपस्थित होते.



> सुरुवातीला दीड ते दोन महिने स्वच्छता निरीक्षकांच्या माध्यमातून ॲप वापरले जाणार आहे. त्यानंतर पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना या ॲपचा वापर करता येणार आहे. स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून या ॲपची संकल्पना नागरिकांना अत्यंत उपयुक्त ठरेल.
>
> - गणेश देशमुख, आयुक्त

### *असे काम करील ॲप*

*शौचालयांच्या रिअल टाईम स्थितीबाबत मॉनिटरिंग करण्यासाठी पालिकेने एक पथक तयार केले आहे. ॲपवर अपलोड केलेल्या एका फोटोच्या माध्यमातून स्वच्छतागृहाची पूर्ण माहिती मिळणार आहे. व्हॅलेक्टस ही कंपनी सुरुवातीला हे ॲप महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांसाठी उपलब्ध करून देणार आहे. कर्मचाऱ्यांनी स्वच्छतागृहाचे जिओ टॅगिंगचे फोटो पाठवल्यावर स्वच्छता निरीक्षकांना त्या वॉर्डचे नाव, प्रत्यक्ष ठिकाणाचे नाव, वेळ, शौचालयामधील पायऱ्या, फरशा, कचऱ्याचा डबा, नळ, बादल्या याची सद्यस्थिती डॅशबोर्डवर दिसणार आहे.*

### दोन महिन्यांत नागरिकांसाठी खुले करणार

भौगोलिक माहिती प्रणालीच्या मदतीने स्वच्छता व पायाभूत सुविधांबद्दल माहिती संकलित केली जाणार आहे. तीच माहिती वेबसाइटद्वारे नकाशावर प्रदर्शित केली जाणार आहे. या नकाशावर महापालिकेला शौचालयाच्या स्वच्छतेच्या स्थितीची माहिती मिळणार आहे. जसे स्वच्छतागृह वापरण्यायोग्य आहे की नाही. जवळचे वापरण्यायोग्य उपलब्ध शौचालय इत्यादी. यात मोबाइल जिओफेन्सिंग कार्यप्रणाली वापरण्यात आली आहे जी शौचालयाच्या रिअल टाइम मॉनिटरिंगची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी मदत करते. येत्या दीड-दोन महिन्यात हे ॲप नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे.

> पिल्लई इंजिनीअरिंग कॉलेजचे मुख्य ऑपरेटिंग ऑफिसर प्रियम पिल्लई यांनी बऱ्याचशा सरकारी संस्थांशी याबाबत संपर्क साधला होता. परंतु त्यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी हे ॲप विकसित करण्यासाठी पाठिंबा दिला.
>
> - निवेदिता श्रेयंश, जनसंपर्क अधिकारी, पिल्लई कॉलेज